| MHNS170010192025 | रत्नाबाई नंदकिशोर कुलकर्णी<br>विरुध्द<br>कोणीही नाही |
|---|---|

**निशाणी १ खालील आदेश**
**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४७/२०२५**
**(जाहिर दि.२१ एप्रिल , २०२६)**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी भारतीय वारसा हक्क कायदा कलम १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे वारसा हक्क दाखला मिळणेबाबत केला आहे.

२. अर्जाची थोडक्यात हकीकत अशी की, अर्जदार क्र.१ हया अर्जदार क्र. २ ते ४ यांच्या आई आहेत. अर्जदार क्र. २ ते ४ हे सख्खे भाऊ बहिण आहेत. अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ चे वडील कै. नंदकिशोर दत्तात्रय कुलकर्णी हे दि.२३/०७/२०२५ रोजी मयत झाले आहेत. कै. नंदकिशोर कुलकर्णी यांचे नावे महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा नांदगाव येथील बचत खाते क्र.८००१२५११३१४ मध्ये रक्क्म रुपये ३,२६,४१९.२०/- व त्यावरील व्याज ही रक्क्म शिल्लक आहे. कै. नंदकिशोर दत्तात्रय कुलकर्णी यांना अर्जदारांव्यतीरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदाराने वर नमुद खात्यामधील रक्कम मिळणेकरीता संबंधीत बँकेमध्ये मागणी केली असता त्यांना न्यायालयाकडुन वारसा दाखला आणणेबाबत कळविलेने प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

३. निशाणी १२ प्रमाणे दि. २४/१२/२०२५ रोजीच्या दैनिक पुण्य नगरी या वृत्तपत्रामध्ये जाहिर नोटीस प्रसिध्द करुन आक्षेप मागविण्यात आला होता. विहीत कालावधीमध्ये सामनेवालेतर्फे कोणीही आक्षेप नोंदविला नाही.

४. निर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील कारणांसहित निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जात मागणी केल्याप्रमाणे अर्जदार वारस दाखल मिळणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी.. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**५.** अर्जातील कथनांची पुष्टी करण्यासाठी अर्जदार क्र.१ रत्नाबाई नंदकिशोर कुलकर्णी यांनी पुराव्याचे शपथपत्र निशाणी ११ वर दाखल केले आहे. अर्जदाराने प्रतिज्ञापत्रामध्ये अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. तसेच निशाणी १३ अर्जदाराने पुरावा बंद केल्याची पुरसिस दाखल केली आहे.

**६.** अर्जदाराने पुराव्याकामी अभिलेखावर खालीलप्रमाणे दस्तऐवज दाखल केले आहेत.

| | **दस्ताचे वर्णन** | **निशाणी** |
|---|---|---|
| १. | अर्जदार यांचे आधारकार्डची झेरॉक्स प्रत | ३ चे यादीसोबत |
| २. | कै. नंदकिशोर दत्तात्रय कुलकर्णी यांच्या मृत्युदाखल्याची झेरॉक्स प्रत | ३ चे यादीसोबत |
| ३. | कै. नंदकिशोर दत्तात्रय कुलकर्णी यांचे नावाचे महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा नांदगाव येथील बचत खात्यावरील खातेउतारा. | ३ चे यादीसोबत |

### मुद्दा क्र.१ साठी

**७.** अर्जदार क्र.१ रत्नाबाई यांनी अभिलेखावर पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन अर्जातील कथनांची पुष्टी केलेली आहे. अर्जदाराच्या शपथेवरील कथनांना कोणीही आव्हान दिलेले नाही. तसेच आजपावेतो कोणीही आक्षेप नोंदविलेला नसल्यामुळे अर्जदाराने दाखल केलेला तोंडी व लेखी पुरावा विना आव्हानित राहिलेला आहे. त्यामुळे अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेल्या नमूद कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार यांचे व्यतिरिक्त कै. नंदकिशोर दत्तात्रय कुलकर्णी यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत.

८. अर्जदाराने अर्जातील कथनांच्या पृष्टयर्थ शपथपत्र दाखल करुन संयुक्तिक असा कागदोपत्री पुरावा सादर केलेला आहे. प्रकरणातील तोंडी व लेखी पुराव्याचे अवलोकन केले असता, मयत कै. नंदकिशोर दत्तात्रय कुलकर्णी हे दि.२३/०७/२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसते. तसेच अर्जदार हेच मयत कै. नंदकिशोर दत्तात्रय कुलकर्णी यांचे कायदेशीर वारस असल्याचे देखील दिसते. त्याकरीता मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, अर्जदार हेच कै. नंदकिशोर दत्तात्रय कुलकर्णी यांचे नावे जमा असलेली रक्कम रु. ३,२६,४१९.२०/- चे कायदेशीर वारस आहेत. करीता, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत कै. नंदकिशोर दत्तात्रय कुलकर्णी यांचे नावे महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा नांदगाव येथील बचत खाते क्र.८००१२५११३१४ मधील जमा असलेली रक्कम रु. ३,२६,४१९.२०/-(अक्षरी तीन लाख सव्वीस हजार चारशे एकोनाविस रुपये व वीस पैसे) व त्यावरील व्याजासह जमा होणा-या रक्कमेसह मिळण्यास पात्र आहेत. |
| ३. | रक्कम रु.३,२६,४१९.२०/-(अक्षरी तीन लाख सव्वीस हजार चारशे एकोनाविस रुपये व वीस पैसे) इतक्या रकमेवर योग्य ते न्यायालयीन शुल्क स्विकारुन अर्जदार क्र. १ ते ४ यांचे लाभात उत्तराधिकार प्रमाणपत्र देण्यात यावे. |

JAGDISH MADHAV AGNIHOTRI
Digitally signed by JAGDISH MADHAV AGNIHOTRI Date: 2026.04.21 14:44:50 +0530

(जे. एम. अग्निहोत्री)

नांदगांव. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदगांव.

दि.२१/०४/२०२६. ता.नांदगांव, जि.नाशिक.

(MH02817)

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app "**eCourts Services**" from Android or iOS